# ग्रामीण विकासात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या समस्या व प्रश्न

**डॉ. नितीन कारभारी जाधव**
राज्यशास्त्र विभाग
जी. एम. डी. आणि बी. डब्ल्यू.
महाविद्यालय, सिन्नर.

**प्रस्तावना :**

प्राचीन काळी जनतेचे संरक्षण व सुव्यवस्थेसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांची निर्मिती झाली. काळाच्या गरजेनुसार त्यांचा विकास होत गेला वैदिक काळातही स्थानिक स्वराज्य संस्थेचे अस्तित्व दिसून येते. त्यानंतर मौर्य काल, गुप्त काळ अशा विविध काळात ग्रामपंचायती अस्तित्वात होत्या या काळात दळणवळण साधनांची कमतरता असल्याने मध्यवर्ती सत्तेला म्हणजेच राजाला दूरच्या प्रदेशावर नियंत्रण ठेवणे शक्य नसल्याने त्यामधून स्थानिक स्वराज्य संस्थांना महत्त्व प्राप्त झाले. मेगॅस्थेनीस व कौटिल्याच्या लिखाणात देखील स्थानिक स्वराज्य संस्थांचा उल्लेख आढळतो स्वातंत्र्यपूर्व काळात भारतीयांना या संस्थांच्या माध्यमातून स्वयं शासनाचा अधिकार पहिल्यांदा प्राप्त झाला ब्रिटिशांनी प्रशासन व्यवस्थेवर पकड राहावी म्हणून प्राचीन संस्थांचा आधार न घेता नोकरशाही मजबूत केली. ब्रिटिशांनी केंद्रीय नियंत्रण ठेवण्याच्या धोरणामुळे ग्रामपंचायती सक्षम झाल्या नाही. एकंदरीत इंग्रजांच्या काळात ग्रामपंचायतींचे विघटन झाले. स्वातंत्र्यानंतर ग्रामीण भागातील मागासलेपणा दूर करण्यासाठी आणि त्या समाजापुढील समस्यांचे निराकरण करण्यासाठी तसेच महात्मा गांधींच्या ग्राम विकेंद्रीकरणाचे स्वप्न साकारण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांची निर्मिती करण्यात आली भारतीय राज्य घटनेच्या 40 व्या कलमात ग्रामपंचायतींची स्थापना व्हावी अशी तरतूद करण्यात आली सामूहिक विकास योजना आणि राष्ट्रीय विस्तार सेवा यांना आलेले अपयश लक्षात घेऊन या योजनांचा अभ्यास करण्यासाठी केंद्र सरकारने बलवंतराव मेहता समितीची स्थापना 16 जानेवारी 1957 ला केली. मेहता समितीच्या शिफारशी आधारे भारताच्या निरनिराळ्या राज्यांमध्ये पंचायतराजचा पाया घातला. केंद्रसरकारने मेहता समितीच्या शिफारशी स्वीकारल्या त्यानुसार 2 ऑक्टोंबर 1959 ला राजस्थान मध्ये पंचायत राज ची सुरुवात प्रथम झाली. स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्रातही वसंतराव नाईक समितीच्या शिफारशीनुसार पंचायत राज्याची स्थापना करण्यात आली त्यानंतर बोंगीरवार समिती, बाबुराव काळे समिती, पी. बी. पाटील समिती आदी सुधारणा समित्यांनी अनेक सुधारणा सुचविल्या तरीही स्थानिक स्वराज्य संस्था पुढे आजही अनेक

समस्या व प्रश्न आहेत या संदर्भाने प्रस्तुत संशोधन निबंधात चर्चा करण्यात आली आहे.

**अभ्यासाचे उद्देश :**

1. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या समस्या व प्रश्न अभ्यासणे.
2. स्थानिक स्वराज्य संस्थांची सद्यस्थिती अभ्यासणे.

**संशोधन पद्धती :**

उपलब्ध माहितीच्या आधारे विषयाची मांडणी करण्यासाठी वर्णनात्मक पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. तसेच प्रस्तुत लघुशोध निबंधासाठी दवितीय तथ्य सामग्रीचा आधार घेण्यात आला आहे. ग्रामीण विकासात स्थानिक स्वराज्य संस्था पुढे अनेक समस्या व आव्हाने यांचा अभ्यास करून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सद्यस्थितीचा आढावा घेणे यासंदर्भात अभ्यास करण्यासाठी प्रस्तुत शोधनिबंधात दवितीयक तथ्य सामग्रीचा आधार घेऊन निष्कर्षापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**स्थानिक स्वराज्य संस्थांत पुढील समस्या व प्रश्नांचे विश्लेषण :**

73 व्या घटनादुरुस्तीने स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक दर्जा बहाल केला मात्र प्रशासन कार्यक्षमपणे चालून विकासाची प्रक्रिया राबविण्यासाठी अनेक समस्या या स्थानिक स्वराज्य संस्था समोर उभ्या आहे त्यामध्ये वित्ताची उणीव, सहभागाचे कमी प्रमाण, पदाधिकारी व अधिकारी सबंध, कर्मचारी वर्गाच्या समस्या, जातीपातीचा प्रभाव अशा अनेक समस्या स्थानिक स्वराज्य संस्थां पुढे आहे.

**1) सहभागाची समस्या:**

स्थानिक स्वराज्य संस्थातील विशेषता ग्रामसभेतील सहभाग अद्यापही समाधानकारक नाही लोक पंचायतराज प्रश्न बाबत जागरूक नाहीत ग्रामीण भागातील साक्षरतेचे प्रमाण देखील त्यास कारणीभूत आहे त्यामुळे लोक स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रक्रियेत सक्रियपणे सहभागी होत नाही जनतेचा सहभाग कमी असल्यास पंचायत राज संस्थांच्या उद्देश फोल ठरतो सहभागाचे प्रमाण कमी असण्याचे आणखी एक महत्वाचे कारण म्हणजे जनतेत जाणिवेचा असणारा अभाव होय स्थानिक राजकारणात पैसा, जातीय समीकरणे, राजकीय दवेष यामुळे सहभागावर परिणाम होतो स्त्रिया देखील आजही स्थानिक संस्थांच्या सहभागाबाबत उदासीन असल्याचे दिसून येते. कौटुंबिक कार्यक्षेत्र सोडून राजकारणात सहभागी होण्यास स्त्रिया तयार होत नाही किंवा पुरुषप्रधानता त्यामध्ये अडचण ठरते. अशा परिस्थितीत केवळ राखीव जागांमुळे त्यांना राजकारणात आणले जाते. अशा वेळी स्त्रिया केवळ नावापुरत्या सहभाग दर्शवितात. वास्तविक निर्णय पुरुषांद्वारे घेतला जातो. घराणेशाही व जात यामुळे सहभागावर प्रभाव पडल्याचे दिसून येते. ग्रामीण विकासाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी जनसहभागात वाढ होणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी सोशल मीडियाद्वारे जागृकता वाढवणे गरजेचे आहे.

**2) पदाधिकारी व अधिकारी सबंध:**

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये राजकीय व प्रशासकीय घटकात संघर्षाची संबंध हे पंचायत राज संस्थांना पुढील समस्या बनली आहे पदाधिकारी हे

पंचायतराज संस्थांचे नेतृत्व करीत असते तरी प्रशासकीय अधिकाऱ्यांवर मात्र त्यांचे नियंत्रण चालत नाही प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या तुलनेत पदाधिकाऱ्यांना मिळालेले अधिकार मर्यादित असतात त्यामुळे पदाधिकाऱ्यांना आपली कामे करून घेण्यासाठी बऱ्याच वेळी प्रशासकीय कर्मचाऱ्यांवर अवलंबून राहावे लागते अशा प्रक्रियेत कामे करून घेताना पदाधिकारी आणि प्रशासकीय अधिकारी यांच्यातील संघर्ष प्रतिकूल परिणाम करतात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रशासनावर व कामकाजावर त्याचा परिणाम होतो तसेच राजकीय पदाधिकारी सुशिक्षित नसल्यास अडाणीपणामुळे अधिकाऱ्यांना समस्यांना सामोरे जावे लागते अशा परिस्थितीत राजकीय प्रशासकीय घटकात संघर्ष निर्माण होतो त्याचाही दुरगामी परिणाम ग्रामीण विकासावर होतो.

**3) प्रशासनाच्या समस्या:**

स्थानिक स्वराज्य संस्थेत ग्रामसेवक, विस्तार अधिकारी, गटविकास अधिकारी, चतुर्थ सेवा कर्मचारी यांना काही समस्यांना सामोरे जावे लागते नोकरांची सुरक्षिततेचा प्रश्न देखील महत्त्वाचा आहे कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते, पदोन्नती अशा अनेक बाबतीत केंद्रीय कर्मचाऱ्यां इतक्या सुविधा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कर्मचाऱ्यांना मिळत नाही सहाजिकच त्यांना आपल्या कामात रस वाटत नाही ते आपले काम मनपूर्वक करताना समाधान वाटत नाही अशा गंभीर समस्यांमुळे त्यांच्या इच्छाशक्तीवर परिणाम होतो असे कर्मचारी मानसिक दृष्ट्या उदासीन बनतात परिणामी विकास कामे आणि ग्रामीण जनता याबाबत त्यांना रस वाटत नाही. कधीकधी राजकीय हस्तक्षेप हे कारण देखील प्रशासनापुढे प्रश्न निर्माण करते प्रशासन प्रक्रिया चालू असताना राजकीय हितसंबंधांमुळे प्रशासकीय अधिकाऱ्यांना निर्णय घेताना राजकीय हस्तक्षेप दबाव टाकतो त्यामुळे कर्मचारी पारदर्शीपणे काम करू शकत नाही त्याचा गंभीर परिणाम विकासावर होतो. म्हणून प्रशासनाच्या समस्या सोडून त्यांच्या कार्यक्षमता वाढविण्यासाठी प्रशिक्षण अत्यंत महत्त्वाचा उपाय ठेवतो.

**4) जातीयता व धार्मिकता:**

गावाची सामाजिक स्थिती स्वातंत्र्यपूर्व कालखंडात विषमतेवर आधारित होती. स्वातंत्र्यानंतर राज्यघटनेनुसार चातुर्वर्ण्य व्यवस्था मोडीत काढून समताधिष्ठित समाजाची निर्मिती देशांमध्ये करण्यात आली. लोकशाही विकेंद्रीकरण करण्याचा प्रयत्न करण्यात आला मात्र आजही खेड्यांमध्ये जातीयता व धार्मिकतेचा प्रश्न स्थानिक स्वराज्य संस्थांत पुढे असल्याचे दिसून येते. समाजात प्रभावशाली समजल्या गेलेल्या जातींनी या संस्थांना आपल्या कायम वर्चस्वाखाली ठेवलेले दिसून येते. त्यामुळे लोकशाही व्यवस्थेत बळकटी प्राप्त होण्याऐवजी अनिष्ट गोष्टींना चालना मिळण्याची प्रकार दिसून येतात. लोकशाही विकेंद्रीकरणाचा तत्त्व पायदळी तुडवले असल्याचे दिसून येते. विकास प्रक्रिया राबवताना ग्रामपंचायतीपासून तर जिल्हापरिषदे पर्यंत सर्वच ठिकाणी जातीयता व धार्मिकता अडथळा असल्याचे दिसून येते. ग्रामीण विकास करताना प्रवाहात आपणास विचारात घेतले जाणार नाही याची खंत मनात असल्याने मानसिक उदासीनतेमुळे

मागासवर्ग दुरावला जातो परिणामी त्याचा परिणाम ग्रामीण सामाजिक विकासावर होतो.

**निष्कर्ष :**

- आधुनिक सोशल मीडिया सारख्या प्रसारमाध्यमांचा वापर करून ग्राम संस्थांमध्ये जनसहभाग बाबत जागृतता वाढवणे आवश्यक आहे.
- पदाधिकारी व अधिकारी यांना त्यांच्या कार्याबाबत प्रशिक्षण दिल्यास निश्चितच राजकीय प्रशासकीय घटकांमध्ये संघर्ष निर्माण होणार नाही.
- प्रशासकीय घटकांच्या समस्यांची सोडवणूक करून त्यांना समाधानकारक वेतन व सेवाशर्ती दिल्यास निश्चितच ते कार्यक्षमतेने काम करतील.
- जातीयता व धार्मिकता पाळणाऱ्यांना पंचायत निवडणुकांमध्ये सहभाग घेण्यास बंदी करण्यात यावी त्यामुळे जातीयता कमी होईल.

**समारोप:**

ग्रामीण स्वराज्य संस्था ह्या लोकशाही विकेंद्रीकरणाचा च्या पाठशाळा आहेत. भारतासारख्या कृषिप्रधान देशात राष्ट्राच्या सर्वांगीण विकासाच्या कार्यात या संस्थांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. ब्रिटिशांच्या प्रशासन व्यवस्थेत ज्या प्रकारची शिस्त होती तशी शिस्त स्वातंत्र्यानंतरच्या कालखंडात निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला मात्र ऐवजी भ्रष्टाचारात अधिक वाढीस लागल्याचे दिसून येते आणि म्हणून राष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी जनसहभाग वाढावा म्हणून जागरूकता होणे गरजेचे आहे तसेच राजकीय व प्रशासकीय घटकातील संघर्ष सोडवण्यासाठी स्वतंत्र आस्थापण असावे. प्रशासनाची उदासीनता कमी होण्यासाठी त्यांच्या समस्या तात्काळ सोडविल्यास त्यांची कार्यक्षमता वाढेल तसेच प्रशासनाला प्रशिक्षणाच्या माध्यमातून त्यांच्यातील कार्यक्षमता व आत्मविश्वास वाढवणे गरजेचे आहे. जातीयता ही भारतीय समाजाला लागलेली कीड आहे. प्रशासन देखील त्याला अपवाद नाही असे असले तरी भारतासारख्या लोकशाही राष्ट्रात राज्यघटनेतील समतेचे तत्व प्रत्यक्षात येण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिक वित्तीय सहाय्य केंद्र व राज्य सरकारकडून झाल्यास त्या लोकहिताची कामे करू शकतील.

**संदर्भ ग्रंथ :-**

१. वा. भा. पाटील, पंचायतराज, प्रशांत प्रकाशन, जळगाव, 2009.
२. वाईकर अनंत वासुदेव, भारत सरकार आणि भारतातील स्थानिक स्वराज्य संस्था, निराली प्रकाशन, पूणे, 2006.
३. व्ही. बी. पाटील, महाराष्ट्रातील पंचायतराज, के. सागर पब्लिकेशन्स, पूणे, 2009
४. धनंजय आचार्य, मराठा सत्तेचा उदय, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, 2007.
५. अर्जुनराव दर्शनकार, पंचायतराज आणि नागरी प्रशासन, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद.
६. भोले भा. ल., भारताचे शासन आणि राजकारण, पिंपलपुरे आणि कंपनी, तिसरी आवृत्ती, नागपूर, २००८.
७. सुधीर बोधनकर व अलोणी, सामाजिक संशोधन, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००७.